वर्ष-०७ अंक-२४ मुंबई, मंगळवार ०४ ते १० मे २०२१ पृष्ठ-४

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक ●कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक

PG 2 भेंड्यात गोळीबार एकजण जखमी मैदानावर क्रिकेट खेळणा-याच्या छातीत घुसली गोळी",

3 → कंपनीतही घडू लागले मारहाणीचे प्रकार, कामात चुका काढल्याने तिघांना मारहाण

परमबीर सिंग यांच्याविरुद्धच्या चौकशीतून संजय पांडेंची माघार ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## मुंबईत 2 ऑक्सिजन सिलेंडर रिफिलिंग प्लँटच्या निर्मितीचा मुंबई पालिकेचा निर्णय



मुंबईत कोरोना रुग्णसंख्या वेगाने वाढत असल्याने अनेक रुग्णालयांमध्ये ऑक्सिजनचा तुटवडा भासत आहे. दरम्यान ऑक्सिजन रिफिलिंग प्लँटद्वारे पुरवण्यात येणारे ५० टक्के ऑक्सिजन ठाणे आणि नवी मुंबईला वळविले जात आहे. त्यामुळे मुंबई ...पान २ वर...

## 'मुंबई आमची-सामान्य माणसांची'! मुंबईतील सामान्य माणसांसाठी मुंबईकरांचं अभियान



मुंबई हे एक असे शहर आहे ज्या शहराला झोप येत नाही. जागेपणी स्वप्न बघणारी एकीकडे चकमक ...पान २ वर...

# मोदी-शहा हे काही अजिंक्य नेते नाही : संजय राऊत





## 'ममतादीदींनी आपण कोण आहोत, हे दाखवून दिलं आहे. जिद्द काय असते हे ममतादीदींकडून शिकण्यासारखं आहे'

मुंबई, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांनी हॅटट्रिक साधत दणदणीत विजय मिळवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा हे मोठे नेते आहे, पण अजिंक्य नाही, हे आज बंगालच्या जनतेनं दाखवून दिलं, अशी बोचरी टीका शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केली. पश्चिम बंगालच्या निकालाबाबत असताना संजय राऊत यांनी आपली रोखठोक प्रतिक्रिया दिली. 'पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसला फक्त बहुमत मिळाला नाही, तर प्रचंड बहुमत मिळालं आहे. ममता बॅनर्जी यांना 125 जागा सुद्धा मिळणार नाही, निकालानंतर ममतादीदी घरी जातील असं वातावरण निर्माण केलं गेलं होतं. पण ममतादीदींनी आपण कोण आहोत, हे दाखवून दिलं आहे. जिद्द काय असते हे ममतादीदींकडून शिकण्यासारखं आहे' असं कौतुक करत संजय राऊत यांनी ममतादीदींचं अभिनंदन केलं आहे.

...पण बंगालच्या जनतेने भाजपला सत्तेपासून दूर ठेवले, खडसेंचा टोला 'ममतादीदी नंदीग्राम मतदारसंघामधून सुद्धा जिंकतील. यात शंका नाही. पण, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा हे अजिंक्य नेते नाही, पण मोठे नेते आहे. निवडणूक जिंकण्याचे तंत्र त्यांच्याकडे आहे. सत्ता आहे. पण ते अजिंक्य नाही, हे आज पश्चिम बंगालच्या निवडणुकीतून दिसून आलं आहे' असा टोलाही राऊत यांनी लगावला.



'बेळगावमध्ये आम्ही मराठी माणसासाठी मैदानात उतरलो होतो. आम्ही त्यांच्यासाठी लढलो. निकाल काय लागतो हे नंतर पाहू, पण मराठी माणसं या निमित्ताने एकत्र आली, असंही राऊत म्हणाले. संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलत असताना पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी जिंकतील, असं भाकित वर्तवलं होतं. तसंच, पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांची सत्ता येणार हे स्पष्ट दिसत आहे. जेव्हा संपूर्ण निकाल हाती येईल, तेव्हा ममता बॅनर्जी या सत्ता स्थापन करतील. त्यांनी ज्या पद्धतीने नियोजन केलं, त्याचं कौतुक केलं पाहिजे. भाजपने सगळी ताकदपणाला लावली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पश्चिम बंगालमध्ये तळ ठोकून होते. अनेक केंद्रीय नेते हे बंगालमध्ये प्रचाराला आले होते. भाजपच्या संख्या नक्की वाढत आहे. लोकसभेतही जागा वाढेल. ...पान २ वर...

# मोठा दिलासा!

## दैनंदिन रुग्णसंख्येत 6 हजारांनी घसरण; रिकव्हरी रेट सुद्धा वाढला



राज्यात दररोज होणाऱ्या रुग्णांच्या संख्येत आज कमी दिसून आली आहे. ही महाराष्ट्रासाठी एक दिलासादायक बातमी आहे.

मुंबई, 2 मे: गेल्या अनेक दिवसांपासून राज्यात 60 हजारांहून अधिक रुग्णांची दररोज वाढ होत होती. या रुग्णवाढीला आता ब्रेक लागला आहे कारण, आज रुग्णांच्या संख्येत घसरण (covid numbers decreased in Maharashtra) झाली आहे. आज राज्यात 56,647 नवीन रुग्णांचे निदान (56647 new cases) झाले आहे. जे कालच्या तुलनेत जवळपास 6600 हून कमी आहे. 1 मे रोजी राज्यात 63282 नवीन रुग्णांचे निदान झाले होते. म्हणजेच दैनंदिन रुग्णसंख्येत सहा हजारांहून अधिक घसरण झाली आहे आणि महाराष्ट्रासाठी (Maharashtra) ही एक दिलासादायक बातमी आहे.

महाराष्ट्रात आज 56,647 नवीन रुग्णांचे निदान झाले आहे. तर 51,356 रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. राज्यात आजपर्यंत एकूण 39,81,658 रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण 84.31 टक्के इतके झाले आहे. आजपर्यंत तपासण्यात आलेल्या 2,76,52,758 प्रयोगशाळा नमुन्यांपैकी 47,22,401 ...पान २ वर...

# अवैध प्लास्टिक साठ्यावर धाड

## उपायुक्त अजित मुठे यांची धडक कारवाई



शांतीगंगा हौसींग सोसायटी येथे असलेल्या प्रेम पकेजिंग या प्लास्टिक दुकानाची आज अचानक तपासणी केली असता तेथे मोठया प्रमाणावर प्लास्टिक साठा आढळून आला. उपायुक्त अजित मुठे यांनी आरोग्य विभागाचे राजकुमार कांबळे, घरत यांना बोलावून सदर साठा जप्त करण्यास सांगितले.त्यानुसार प्ल्लास्टिकचा साठा जप्त करण्यात आला. याबाबत सविस्तर वृत्त असे कि, महापालिकेचे उपायुक्त अजित मुठे यांना प्रभाग तीन मध्ये काही ठिकाणी अवैध प्लास्टिक साठा असल्याची माहिती मिळाली.त्यानुसार आज अचानक मुठे यांनी शांती गंगा हौसिंग सोसायटी येथे पाहणी केली असता प्रेम पकेजिंग हे दुकान अर्धवट उघडे दिसले. मुठे यांनी दुकानात ...पान २ वर...



# होमीओपैथिक डॉक्टरांना शासकिय वैदयकिय सेवेत सामील करावे.

## 60 हजार ते 70 हजार डॉक्टर उपलब्ध होतील.



डॉ. धीरज भालेराव

कोरोनाच्या काळातफ्रंट लाईन वॉरियर्स मध्ये वैदयकिय सेवेला खुप महत्व आले आहेत आज किमान १५०० ते २००० लोकांमागे १ डॉक्टरची गरज आहे. कित्येक खेडोपाडी आजही डॉक्टर नाही. M.B.B.S. डॉक्टर्स खेड्यात जाण्यासाठी तयार नाहीत. व आज तर शासकिय यंत्रणेवर कोरोना काळात जास्त गरज डॉक्टरची आहे. आता तरी शासनाने C.C.M.P कोर्स (modern Pharma) आणलेला असुन उत्तीर्ण झालेले डॉक्टर्स उपलब्ध आहेत. ६०,००० ते ७०,००० डॉक्टरर्स चे कोरोना Vaccination व वैदयकिय सेवेसाठी उपलब्ध आहेत. शासनाने याची दखल घ्यावी. शक्य तितक्या लवकर लसीकरण हाच करोनावर प्रभावी उपचार आता लसी करणा शिवाय पर्यायच नाही. लसीकरण केलेला पेशंट दगावत नाही. हे सिद्ध झालेले आहे. पण ते वेळेत झालेले असावे.

जगात इस्त्राईल, इंग्लड इ. देशाने वेगाने लसीकरण केल्यांने कोरोना आटोक्यात आलेला आहे.


भारतात सर्व शासकिय खाजगी डॉक्टरांची मदत घेऊन वेगाने लसीकरण केल्याने बऱ्याच प्रमाणात कोरोना आटोक्यात येईल.

# मिरा भाईंदर मध्ये मॉर्निग वॉकसाठी फिरणाऱ्या नागरिकांकडुन 1 लाख 17 हजार रुपये दंड वसूली - मिरा भाईंदर महानगरपालिका पथकाची कारवाई.





गेल्या काही दिवसांपासून सपूर्ण भारतामध्ये कोविड-19 या साथीच्या आजाराने थैमान घातलेले आहे. यात अनेक नागरिकांचा यामुळे दुदैवाने मृत्यू झालेला आहे. नागरिक विनाकारण घराबाहेर पडतात. व आपल्या बरोबर इतरांचाही जीव धोक्यात आणतात. या करीता शासनाने प्रतिबंधक उपाय योजून तसे आदेश दिलेले आहेत. मिरा भाईंदर ...पान २ वर...



# भेंड्यात गोळीबार एकजण जखमी मैदानावर क्रिकेट खेळणा-याच्या छातीत घुसली गोळी",



भेंडा (जि. अहमदनगर ) : रविवारी रात्री भेंडा येथे पूर्वीच्या वादातून झालेल्या गोळीबारामध्ये सोमनाथ बाळासाहेब तांबे (वय २१ वर्षे, रा. भेंडा, ता.नेवासा ) हा युवक जखमी झाला असून त्याचेवर नेवासा फाटा येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.याबाबत मिळालेली प्राथमिक माहिती अशी की, भेंडा येथील सोमनाथ तांबे आपल्या मित्रांसोबत रविवार दि.२ मे रोजी रात्री भेंडा येथील एका मैदानावर क्रिकेट खेळत असताना रात्री ९.३० वाजेच्या सुमारास दुचाकीवरून आलेल्या दोन तरुणांपैकी एकाने खेळत असलेल्या तरुणांच्या दिशेने गोळीबार केला. त्यात चुकून गोळी लागल्याने सोमनाथ गंभीर जखमी झाला. गोळी त्याचे छातीत मधोमध लागल्याने तो थोडक्यात बचावला. गोळीबार करून हल्लेखोर घटनास्थळावरून पळून गेले.दरम्यान हल्लेखोरांचा इतर दुसऱ्या कोणाला तरी लक्ष करावयाचे होते परंतु खेळता खेळता सोमनाथमध्ये आल्याने त्याला गोळी लागली असे सांगितले जाते. दरम्यान नेवासा पोलिस ठाण्यात भादंवि कलम ३०७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आज सकाळी पोलिस निरीक्षक विजय करे यांचेशी संपर्क साधला असता जखमी सोमनाथ तांबे यांचे जबाब व फिर्यादी वरून दोन संशयितांना ताब्यात घेतल्याची माहिती त्यांनी दिली.

# मोबाईल दिला नाही म्हणून नागपुरात विद्यार्थिनीचा आत्मघात



नागपूर : जेवण केल्याशिवाय मोबाईल मिळणार नाही, असे आईने ठणकावून सांगितल्यामुळे संतप्त झालेल्या एका विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केली. संस्कृता चंद्रशेखर सिंग (वय १५) असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. ती मानकापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोधणीच्या वाघोबानगरात राहत होती.संस्कृताचे वडील रेल्वेत असून आई गृहिणी आहे. तिला एक भाऊ आहे. ती नववीत शिकत होती. अलीकडे ऑनलाईन क्लासच्या बहाण्याने ती सारखी मोबाईलमध्ये गुंतून जायची. २४ एप्रिलला सकाळपासून ती मोबाईल घेऊन बसली. सायंकाळी सहा वाजता आईने तिला हटकले. मोबाईल ताब्यात घेऊन आधी जेवण करण्यास सांगितले. जेवण केल्याशिवाय मोबाईल मिळणार नाही, असेही सांगितले. हट्ट मांडूनही आईने मोबाईल दिला नाही;. त्यामुळे ती रागावली आणि बाजूच्या खोलीमध्ये गेली. तेथे तिने गळफास घेतला. हा प्रकार लक्षात आल्यानंतर आईने आरडाओरड करून आजूबाजूच्यांना गोळा केले. तिला खाली उतरवून धंतोलीतील एका हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. तेथे पाच दिवस उपचार केल्यानंतर गुरुवारी (दि. २९) सकाळी डॉक्टरांनी संस्कृताला मृत घोषित केले. धंतोली पोलिसांनी या प्रकरणाची माहिती शनिवारी माणकापूर पोलिसांना कळविली. त्यावरून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली. पुढील तपास सुरू आहे.चार दिवसांत तिसरी आत्महत्याचार दिवसांत विद्यार्थ्यांनी केलेली ही तिसरी आत्महत्या आहे. चार दिवसांपूर्वी माणकापूर तसेच हुडकेश्वरमधील दोन विद्यार्थ्यांनी अशाच प्रकारे गळफास घेऊन आत्महत्या केली होती.

# भांडणाला वैतागून मुलाने वयोवृद्ध आईची गळा दाबून केली हत्या; पुरावे लपवण्यासाठी लढवली अनोखी शक्कल




राजस्थानमधील झुंझुनूं येथे आई आणि पत्नीच्या दररोजच्या भांडणाला कंटाळलेल्या एका व्यक्तीने टोकाचं पाऊल उचललं आहे. त्याने आपल्या जन्मदात्या ७५ वर्षीय आईची गळा दाबून निर्घृण हत्या केली आहे आरोपी मुलाने पुरावे नष्ट करण्यासाठी आईच्या मृतदेहावर पेट्रोल टाकून तिला जाळूनही टाकलं. मात्र, त्याने केलेला गुन्हा लपवू शकला नाही. केवळ २४ तासांत पोलिसांनी त्याला अटक केली आहे. ही घटना राजस्थानातील झुंझुनू जिल्ह्यातील आहे. या जिल्ह्यातील सूरजगड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रघुवीरपुरा येथे शुक्रवारी एका वृद्ध महिलेचा जळलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला होता. याबाबतची माहिती आरोपी मुलगा अशोक कुमार याने स्वतः पोलिसांना दिली होती. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला. या हत्येप्रकरणात पोलिसांना सुरुवातीपासून मुलगा अशोक कुमारवर संशय होता. यानंतर पोलिसांनी अशोक कुमार याला ताब्यात घेतलं. तेव्हा सुरुवातीला अशोकने उडवाउडवीची उत्तरं दिली. मात्र, शेवटी आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे. ७५ वर्षीय मृत महिलेचं नाव शरबती देवी असून त्यांना तीन मुलं आहेत. त्या सध्या आपल्या मधल्या म्हणजेच दुसऱ्या नंबरचा मुलगा अशोक कुमारसोबत गावीच राहत होत्या. मात्र, अशोक कुमारची पत्नी आणि त्यांच्यात नेहमी खटके उडत. किरकोळ कारणावरून दररोज होणाऱ्या वादातून आरोपी मुलाने आपल्या आईची गळा दाबून हत्या केली आहे. त्यानंतर त्याने पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेहावर पेट्रोल टाकून जाळला.

# लग्नाचे आमिष दाखवून युवतीचे लैंगिक शोषण



रिसोड : जुन्या ओळखीचे रुपांतर प्रेमात झाल्यानंतर सातत्याने सात वर्षे शारीरिक संबंध प्रस्थापित करून पीडित युवतीची फसवणूक केल्याप्रकरणी शेख मोहसीन शेख पाशु या युवकासह अन्य पाच आरोपींवर पोलिसांनी रविववारी गुन्हा दाखल केला. यासंदर्भात पीडित मुलीने दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, ती आरोग्य सेविका या प्रशिक्षणासाठी कोळसा (ता. सेनगाव) येथे शिक्षण घेत होती. सात वर्षांपूर्वी एका खासगी दवाखान्यात आरोग्य सेविकेचे काम पत्करले. यादरम्यान शेख मोहसीन शेख पाशा हा आपल्या नातेवाईकांना रोज दवाखान्यामध्ये घेऊन येत होता. त्यातून ओळख झाली. कालांतराने ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. रिसोड येथील हॉटेलवर अनेक ठिकाणी भाड्याने खोली करून दोघे एकत्रित राहीले. शारीरिक संबंधासाठी नकार दिला असता त्याने आपल्याला त्याच्या शेतातील घरात नेऊन जबरदस्ती लैंगिक शोषण केले. हा प्रकार सतत सात वर्षे सुरू राहिला, असे पीडीतेने तक्रारीत म्हटले आहे.अशातच काहीच कल्पना न देता १६ एप्रिल रोजी दुसऱ्याच मुलीशी विवाह केला. त्यास याबाबत विचारणा केली असता २७ एप्रिल रोजी बोलायचे आहे, असे सांगून त्याच्या घरी नेऊन दमदाटी केली व जातीवाचक शिवीगाळ करून अपमानास्पद वागणूक दिली.

# घरगुती त्रासातून जावयाने सासूचा गळा दाबून केला खून



पुणे : पत्नीला गावी सोडून सासुबरोबर एकत्र राहणाऱ्या जावयाने दररोजच्या घरगुती भांडणाला कंटाळून रागाच्या भरात हाताने मारहाण करून ओढणीने सासूचा गळा आवळून खून केला. ही घटना बिबवेवाडीतील शेळके वस्ती येथे शनिवारी सकाळी ९ वाजता घडली. पोलिसांनी असिफ दस्तगीर आत्तार (वय २६, रा. शेळकेवस्ती, बिबवेवाडी) याला अटक केली आहे. अनारकली महमद तेरणे (वय ४५) खुन झालेल्या सासुचे नाव आहे. याप्रकरणी मौलाली मंजलापूरे (वय ३१, रा मार्केटयार्ड) यांनी फिर्याद दिली आहे.असिफ हा मंजलापूरे यांच्या पत्नीच्या मामाचा मुलगा आहे. तो मुळचा बेळगाव जिल्ह्यातील हुक्केरी येथील राहणारा आहे. तो ८ ते ९ महिन्यांपूर्वी मंजलापूरे यांच्याकडे आला. त्याने आपले व पत्नीची भांडणे झाली असून मी तिला सोडून दिले आहे. अनारकली ही माझी सासू आहे. मी तिला पळवून आणले असून ती माझी बायको आहे. तिची मुलगी सोनियाही आमच्याबरोबर असल्याचे त्याने मंजलापूरे यांना सांगितले. त्यानंतर मांजलापुरे यांनी ओळखीतून बिबवेवाडी येथील शेळके वस्तीत त्याला भाड्याने खोली घेऊन दिली होती. अनारकली ही नीट जेवण करत नाही. सतत पेसे मागत असते. यावरुन त्यांच्यात रोज भांडणे होत. ३० एप्रिलला त्यांच्यात भांडण झाल्यावर सासूला मारहाण करून असिफ घराबाहेर निघून गेला. रात्रभर रस्त्यावर फिरला. १ मेला सकाळी ९ वाजता तो घरी परतल्यावर त्यांच्यात पुन्हा भांडणे झाली. तेव्हा त्याने रागाच्या भरात ओढणीने तिचा गळा आवळला. ती निपचित पडली. तेव्हा घाबरुन असिफ याने ही गोष्ट मंजलापूरे यांना सांगितली.

त्यांनी तातडीने बिबवेवाडी पोलिसांना जाऊन ही हकीकत सांगितली. पोलिसांनी घर जाऊन पाहिले असता अनारकली हिचा मृत्यु झाला होता. पळून गेलेल्या असिफ आत्तार याचा शोध घेऊन पोलिसांनी अटक केली आहे.

MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
COMPUTER DEPARTMENT
Indira Gandhi Bhavan, Chattrapati Shivaji Maharaj Marg, Bhayander (W) -401101
Tal.Dist. Thane 401101

MBMC/COMPUTER/ 41 /2021-22 Date: - 29/04/2021

// Tender Notice //

Mira Bhaindar Municipal Corporation invites sealed tenders for Supply of Computers, Laptop, DVD & External Hard Disk to MBMC Health department. The tenders form and other relevant document will be available for download on Government E-Tendering website as https://gem.gov.in from dt. 29/04/2021 to 10/05/2021 till 4 p.m.

The last date for submission of tenders computed in all respects on dt. 10/05/2021 till 4.30 p.m. in the above mentioned website. Hon. Commissioner of Mira Bhainder Municipal Corporation has reserve right to reject any or all online bids, without assigning any reasons.

| Sr.No. | Particulars | Bid No. | EMD Amount Rs. | Estimated Cost |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply of Computers, Laptop, DVD & External Hard Disk to MBMC Health Department | GEM/2021/B/1196747 | Rs.10,482/- | Rs.20,96,307/- |

Note :-

1. Tender Documents shall not be sent or received via post.
2. Tender Submission is online only.

जा क्र./ मनपा/जनसंपर्क/६३ /२०२१-२२
दि. २९ / ०४ / २०२१

Sign/-
( R.M. Gharat)
System Manager
Mira Bhainder Municipal Corporation

## पृष्ठ १ वरुन

### मुंबईत 2 ऑक्सिजन सिलेंडर रिफिलिंग

महानगरपालिकेने मुंबईत स्वत:चे दोन ऑक्सिजन सिलेंडर रिफिलिंग प्लँट्स उभारण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या पालिका लहान रुग्णालयांना पुरवत असलेले ऑक्सिजन सिलिंडर्स रिफिलिंगसाठी नवी मुंबईतील दोन रिफिलिंग प्लँट्सकडे जातात. परंतु मुंबईत जर एकदा रिफलिंग प्लँट्स तयार झाले तर शहरातील अनेक रुग्णालयांमधील ऑक्सिजन सिलेंडर्स नवी मुंबईत रिफिलिंगसाठी नेण्याची गरज भासणार नाही. यावर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त पी. वेलरासू यांनी सांगितले की, मुंबईतील महालक्ष्मी रेस कोर्स, मुलुंडच्या रिचर्डसन व क्रुडास जम्बो सेंटरमध्ये आम्ही ऑक्सिजन रिफिलिंग प्लँट उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यातील एक प्लँट लवकरचं सुरु होईल. त्यामुळे जम्बो आणि धुरा ऑक्सिजन सिलेंडर्स नवी मुंबईत रिफिलिंग प्लँटवर नेण्याची गरज भासणार नाही.

राज्यातील ऑक्सिजन तुटवडा लक्षात घेता राज्य सरकारने प्रत्येक जिल्ह्यासाठी ऑक्सिजनचा कोटा निश्चित केला आहे. या कोट्यानुसार लिक्विड ऑक्सिजन टँकरमध्ये किंवा जम्बो आणि दुरा सिलिंडेर्समध्ये ऑक्सिजन भरत ते रुग्णालयांना पाठवले जाते. एका पालिका अधिकाऱ्याने स्पष्ट केले की, मुंबईला दरदिवसा २४० मेट्रिक टन इतके ऑक्सिजनची गरज असते, यातील १८० मेट्रिक टन ऑक्सिजन बड्या रुग्णालयांना पुरवले जाते. दरम्यान दुरा आणि सिलेंडर्सद्वारे ६० मेट्रिक टन ऑक्सिजनचा पुरवठा नवी मुंबईतील सतरामदास गॅसेस आणि फिनिक्स गॅसेस कंपन्या करतात.परंतु या ६० मेट्रिक टन पैकी ५० टक्के ऑक्सिजन पुरवठा पुरवठादार नवी मुंबई आणि ठाणे शहरात करत असल्याचे उघडकीस आले. त्यामुळे पालिकेने यासंदर्भात नवनियुक्त अन्न औषध प्रशासनाचे आयुक्त परिमल सिंग आणि कोकणचे विभागीय आयुक्त अण्णासाहेब मिसाळ यांना पत्रव्यवहार करत मुंबईला ऑक्सिजन सिलेंडर्सचा पूर्ण कोटा मिळावा यासाठी अधिकाऱ्यांची नेमणूक करा अशी मागणी केली आहे. यासंदर्भात आम्ही पुरवठादाराला कारणे दाखवा नोटीस बजावली असून मुंबईला ऑक्सिजन पुरवठा पूर्ववत न झाल्यास कारवाई करु असे इशारा पालिकेचे अतिरिक्त आयुक्त पी. वेलरासू यांनी दिला आहे. तसेच मुंबईत एकदा स्वत:चे ऑक्सिजन रिफिलिंग प्लँट्स तयार झाले की ऑक्सिजन सिलेंडर्स नवी मुंबईला नेण्याची गरज लागणार नाही त्याऐवजी मुंबईतच ऑक्सिजन सिलेंडर्स रिफिल होतील. यामुळे आम्हाला खासगी रिफिलिंग पुरवठेदारांवर अवलंबून राहण्याची वेळ येणार नाही. असेही वेलरासू म्हणाले.

### मोठा दिलासा!

म्हणजेच 17.8 टक्के नमुने पॉझिटिव्ह आले आहेत.
आज कुठल्या विभागात किती रुग्ण?
ठाणे विभाग - 9700
पुणे विभाग - 15776
कोल्हापूर विभाग - 3828
औरंगाबाद विभाग - 3240
लातूर विभाग - 3569
अकोला विभाग - 3601
नागपूर विभाग - 8909

### 'मुंबई आमची-सामान्य

तर दुसरीकडे भयाण अंधार. मुंबई ही मायानगरी आज ६० वर्षाची झाली, हिला नेमकं चालवतं तरी कोण? उत्तर आहे मुंबईकर, हा मुंबईकर बंगला, बी.डी.डी चाळ, बिल्डिंग, झोपडपट्टीत राहणारा पण यांना लागणाऱ्या सुविधा कोण पुरवतं? तर महानगरपालिका.

सर्वात मोठं बजेट असलेली मुंबई महानगरपालिका जीची स्थापना १८८८ साली झाली. मुंबईची लोकसंख्या ३ कोटी २९ लाख, २२७ नगरसेवक, २४ प्रशासकीय वॉर्ड, ज्याचं बजेट ४० हजार करोड आहे. पण वास्तव मात्र वेगळं आहे, कारण मुंबईकरांची आजही सर्व बाबतीत यातायात होत आहे आणि ती होऊ नये म्हणून मुंबईतील मुंबईकर एकत्र येत आहोत हा बदल घडवण्यासाठी. १ मे रोजी मुंबईकरांपर्यंत पोहोचवण्यासाठी या अभियानाच्या भूमिकेचे पोस्टर सोशल मीडिया च्या माध्यमातून प्रकाशित करत आहोत. मुंबई आमची – सामान्य माणसांची भूमिका... मुंबई हे सर्वांच्याच आशा–अपेक्षा आणि स्वप्नांचे शहर. मुंबईकरांच्या कष्टाने-श्रमाने मुंबई हे जागतिक दर्जाचे शहर बनलं, जागतिक बाजारपेठ बनलं. या स्वप्न नगरीमध्ये विषमतेची दरी वाढत आहे. ७० ते ८० टक्के लोकांचं राहणीमान निकृष्ट दर्जाचे होत आहे. या स्वप्न नगरी मुंबईची अशी भकास अवस्था का? मुंबई जितकी श्रीमंत – उच्चभ्रूंची आहे, तितकीच सामान्य माणसांची आहे. पण येथील श्रीमंत – उच्चभ्रूना मिळणाऱ्या सोयी-सुविधा, सामान्य कष्टकऱ्यांना, लोकल ट्रेन – बसने प्रवास करणाऱ्या मुंबईकरांना मिळतात का? रस्त्यावर, फुटपाथवर व्यवसाय करणारे लाखो छोटे व्यापारी, झोपडपट्टी, SRA मध्ये राहणारे, घरकाम करणारे, अनेक असंघटीत मजुरांना, बालकांना, तृतीयपंथींना, दिव्यांगाना मुलभूत सोयी-सुविधांसाठी त्यांना तडजोड का करावी लागते? खड्डेमुक्त -प्रदूषणमुक्त मुंबई मिळणं हा प्रत्येक मुंबईकरांचा अधिकार आहे. 'मुंबई आमची – सामान्य माणसांची' या अभिनयाचे मुख्य ध्येय म्हणजे मुंबईतल्या प्रत्येक नागरिकाचे हक्क, कर्तव्य, जबाबदाऱ्या आणि अधिकारांसाठी जागरूक करून लोकसहभागातून संघर्ष करण्यास प्रवृत्त करणे. त्याचबरोबर मुंबई हि जितकी उच्चभ्रू श्रीमंतांची आहे तितकीच ती सामान्य माणसांची सुद्धा आहे याची जाणीव करून देणे. त्यातून मुंबईचे शासन – प्रशासन सामान्य माणसांसाठी दक्षपणे, सक्षमपणे आणि जबाबदारीने कार्यरत करणे हे ह्या अभियानाचे अंतिम ध्येय आहे. या अभियानात सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय अभ्यासक वर्षा विद्या विलास, अमोल मडामे, डॉ.प्रभा तीरमरे, अविनाश पाटील, डॉ.वत्सला शुक्ला, दीपक सोनवणे, किरण सोलंकी, सुनील चव्हाण, बिलाल खान, फहाद अहमद, संदेश लाळगे, किरण सोलंकी, खुशबू खान, (विकास) आशा पुजारी, सुशील शिंदे, प्रमोद शिंदे, देवेंद्र ठाकुर, जॉनसंन्स एबंझेर , अगस्तीन बेंजामिन, भानुप्रीया नाडर, प्रवीण दाभाडे, मुबारक शेख, अरिश, चाऊस शेख, वींरेंद्र दिवांर, निनाद पाटील, पंकज दळवी, किरण कदम, रमेश कदम, प्रतीक कांबळे, राजेश मोरे, अमोल निकाळजे, संतोष शिंदे, जमीला शेख, नागेश सुर्वे प्रो.जालंदर अडसुले,योगिनी पगारे असे मुंबईत विविध प्रश्नांवर काम करणारे कार्यकर्ते मुंबईकरांना ह्या अभियानात सहभागी होण्यासाठी आवाहन करत आहोत. मुंबईत हे अभियान २२७ वॉर्डात राबविले जाणार आहे ज्यात २४ महानगर पालिका च्या गेट वर मोठी पारदर्शक तक्रार पेटी ठेवावी अशी मागणी ही करण्यात येणार आहे.

### अवैध प्लास्टिक साठ्यावर धाड

जावून गिफ्ट पकींग करीता प्लास्टिक विकत मिळेल का? म्हणून दुकानदाराला विचारणा केली.त्यावर दुकानदाराने मोठया प्रमाणात गिफ्ट पकींगच्या प्लास्टिक पिशव्या दाखविल्या.त्यावर मुठे यांनी दुकानदाराला यावर बंदी आहे,तरी कसे विकता म्हणून विचारणा केली.त्यावर दुकानदाराने तरी आम्ही विकतो असे सांगितले.त्यानंतर मुठे यांनी आयुक्तांना असा साठा व त्यावर कारवाई करीत असल्याचे कळविले.नंतर दुकामदाराला स्वताची ओळख सांगितली आणि प्रभाग अधिकारी संख्ये व आरोग्य विभागाचे कांबळे,घरत यांना बोलावून घेतले. त्यावेळी कर्मचाऱ्यांच्या मदतीने दुकानातील प्लस्टिक साठ्याची तपासणी केली असता तेथे जवळजवळ साडेचारशे किलो प्लास्टिक थैल्या, कंटेनर, ग्लासेस इत्यादी साठा आढळून आला हा सर्व साठा जप्त करुन एका ट्रक मध्ये भरण्यात येवून महापालिकेच्या गोडावून मध्ये पाठविण्यात आला व सदर विक्रेत्याचे दुकान सिल करण्यात आले. या प्रकरणी इतरही संशयास्पद दुकाने सिल करण्यात आलीत.या प्रकरणी दुकानदार मुकेश आणि राजेश यांनी गोंधळ करुन कारवाईतून अडथळा आणण्याचा प्रयत्न केला असता स्थानिक पोलीसांना बोलाविण्यात आले. सदर दुकान सिल करण्यात आले असून मुठे यांनी संबंधित दुकानदारा विरुध्द गुन्हा दाखल करण्याच्या सुचना आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्यात.त्या प्रमाणे कारवाई सुरु करण्यात आली आहे.

### मिरा भाईंदर मध्ये मॉर्निंग

महानगरपालिकाचे आयुक्त श्री. दिलीप दोले यांनीही या संदर्भात शासन निर्देशानुसार आदेश पारित केलेले आहेत. त्याचा परिणाम म्हणून मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णांची संख्या नियंत्रणात राहण्यास मदत झालेती आहे. मात्र असे असतानाही काही नागरिक विना मास्क, चुकीच्या पध्दतीने मास्क लावणे, मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडणे, या गोष्टी करीत असतात. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिकेचे उपायुक्त अजित मुठे यांचे नियंत्रणाखाली मिरा भाईंदर महानगरपालिकेने महापालिकेच्या प्रभाग क्र. 1 ते 6 करीला सहा वर्ग-2 अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली ऐकून 57 भरारी पथके नेमलेली आहेत. यात महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसोबत पोलीस कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. आज दि. 30/4/2021 रोजी या भरारी पथकांदवारे मिरा भाईदर शहरातील विविध ठिकाणी मोर्निंग वॉकसाठी बाहेर पडणाऱ्या, विना मास्क फिरणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. व त्याचप्रमाणे अशा नागरिकांचे कोविड करता असणारी अँन्टीजन टेस्ट करण्यात आली. या सर्व नागरिकांकडून जवळ जवळ 1 लाख 17 हजार दंड वसूल करण्यात आला. महापालिकेने अशी तपासणी व कारवाई यापुठेही सुरू ठेवणार आहे या दृष्टीने जागोजागी अन्टीजन टेस्ट कॅम्प लावण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी अत्यावश्यक सेवा वगळता घराबाहेर पडू नये तसेच रस्त्यावर फिरू नये असे आवाहन महानगरपालिका आयुक्त दिलीप दोले यांनी केले आहे.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार ०४ ते १० मे २०२१





## संपादकीय...

# पुन्हा तिसऱ्या जगात..

दिल्ली, मुंबई अशा महानगरांमध्ये करोनामुळे उडालेल्या हाहाकाराच्या बातम्या लोकांपर्यंत पोहोचत आहेत. पण बिहार आणि उत्तर प्रदेशच्या ग्रामीण भागांमध्ये काय परिस्थिती आहे, हे अद्याप नीट समजलेले नाही. दुसऱ्या लाटेत करोना प्रादुर्भाव शहरांतून गावांमध्ये वळल्याचे दिसत आहे. त्याची व्याप्ती कळल्यावर करोनामुळे देशभर झालेल्या अतिप्रचंड नुकसानाचे खऱ्या अर्थाने आकलन होऊ शकेल. पण बिहारच्या भाजप प्रदेशाध्यक्षांनी- 'कोणी जवळचे डॉक्टरदेखील नाहीत,' असे जाहीरपणे म्हणावे यातच पक्ष म्हणून भाजपची हतबलता दिसून येते. करोनाच्या दुसऱ्या लाटेचा अंदाज घेण्यात आणि ती रोखण्यात केंद्र सरकार व पर्यायाने भाजपला आलेले अपयश झाकण्याचा कितीही प्रयत्न होत असला, तरी भाजपचे नेतेच आपल्या विधानांमधून सरकारी यंत्रणा आणि पक्षसंघटनेला उघडे पाडत आहेत. दिल्लीतील रा. स्व. संघाचे पदाधिकारी राजीव तुली यांनी- प्रदेश भाजप विसर्जित झाला का, असा जाब विचारला. भाजपच्या आयटी विभागातील सदस्य वा त्यांचे प्रवक्ते दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद



केजरीवाल यांच्यावर टीका करत असताना, भाजपचे लोकप्रतिनिधी दिल्लीत कुठेही दिसले नाहीत. त्यामुळे तुलींनी विचारलेला प्रश्न सयुक्तिक होता. दिल्लीतील सात खासदारांपैकी गौतम गंभीर आयपीएल सामन्यांमध्ये गुंग होते. मीनाक्षी लेखी, मनोज तिवारी, रमेश बिधुरी हे वाचाळ खासदार गायब झाले आहेत. चाँदनी चौकातून विजयी झालेले खासदार हर्षवर्धन हे आरोग्यमंत्री असल्याने अवघा देश त्यांच्याकडे आशेने पाहात आहे; पण प्राणवायूचा पुरेसा साठा असून त्याचा पुरवठा होत असल्याची विधाने ते करत आहेत.

रविशंकर प्रसाद, स्मृती इराणी या 'प्रतिक्रियावादी' मंत्रिगणांकडे आता राहुल गांधींवरही टीका करण्याचे अवसान राहिलेले नसावे. भाजपला जाब विचारण्याचे धाडस तुलींनी केले खरे; पण तसे केल्यानंतर संघाने तातडीने त्यांना झिडकारून टाकले. तुलींच्या विधानावर संघाने दुसऱ्या दिवशी लगेच पत्रकार परिषद घेऊन तुलींच्या विधानांशी संघाचा संबंध नसल्याचे स्पष्ट केले. वाजपेयींच्या काळात केंद्रातील भाजप सरकारला जाब विचारण्याचे धाडस संघाचे नेतृत्व करत असे. आता दत्तात्रय होसबाळे यांची संघाच्या सरकार्यवाहपदी झालेली नियुक्ती हा मोदींचा विजय मानला जात आहे! मोदी-शहांच्या राजवटीत संघाच्या नेतृत्वाकडे जाब विचारण्याची ताकद नसल्याचे आणि मोदी-शहांचा संघावर वरचष्मा निर्माण झाल्याचे यानिमित्ताने लोकांसमोर आले. भाजपला 'निवडणूक यंत्र' म्हटले जाते. पक्ष संघटना आणि संघाच्या कार्यकर्त्यांचे जाळे हे या पक्षाच्या राजकीय यशाचे गमक मानले जाते. पण करोनाच्या काळात लोकांना कोणत्याही प्रकारचा दिलासा देण्यासाठी सरकारला या सगळ्या यंत्रणेचा उपयोग करून घेता आल्याचे दिसत नाही.

**निर्णयप्रक्रियेवर अधिकाधिक ताबा**

भाजपला दिल्लीच्या प्रशासनावर पूर्ण नियंत्रण मिळवायचे आहे, ही बाब लपून राहिलेली नाही. करोनाकहराच्या काळातही अरविंद केजरीवाल यांच्या सरकारवर टीका करण्याची एकही संधी भाजपने सोडलेली नाही. सर्वोच्च न्यायालयात प्राणवायू तुटवडय़ाचे खापरदेखील केंद्राने दिल्ली सरकारवर फोडले.

अखेर न्यायालयाला विचारणा करावी लागली की, दिल्ली ही देशाची राजधानी असताना तिथल्या आरोग्य व्यवस्थेची काळजी घेण्याची केंद्राची कोणतीच जबाबदारी नाही का? प्राणवायूचा कोटा दिल्ली सरकारने उचलला नाही म्हणून दिल्लीतील रुग्णालयांमध्ये प्राणवायूचा तुटवडा असल्याचा आश्चर्यचकित करणारा युक्तिवाद केंद्राने केला. उच्च न्यायालयाने तर केंद्राला उद्देशून- 'आता अति झाले, दिल्ली सरकारने मागणी केलेला प्राणवायूचा कोटा तातडीने द्या,' असे निर्देश दिले. दिल्लीकर उपचारांसाठी वणवण करत असताना केंद्र मात्र संपूर्ण अपयश दिल्ली सरकारच्या माथ्यावर मारून मोकळे होताना दिसते. या सगळ्या गोंधळात केंद्राने दिल्ली नायब राज्यपालांच्या हाती देण्यासाठी अधिसूचना काढण्यात मात्र कोणतीही दिरंगाई केली नाही. करोनाच्या आपत्तीतही राजकीय निर्णयप्रक्रियेवर अधिकाधिक ताबा मिळवण्यात केंद्र सरकारने कोणतीही कुचराई होऊ दिलेली नाही, हे विशेष. पंतप्रधान मोदी क्वचितच मंत्रिपरिषदेची बैठक घेतात. मोदींच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्र्यांना फारसे महत्त्व नसते.

पण करोनामुळे मोदींना राज्यमंत्र्यांकडे लक्ष द्यावे लागले असून त्यांना विनंती करावी लागली की, लोकांची विचारपूस करा, लोकांचे काय म्हणणे आहे ते ऐका, मग ते आपल्याला येऊन सांगा! मंत्रिपरिषदेच्या बैठकीचे फलित इतकेच होते की, मोठमोठय़ा गर्जना आणि वल्गना मागे पडल्या आहेत आणि करोनाने मोदी सरकारला केविलवाणे करून टाकले आहे.

# उघडले आंतरजालाचे दार..

केवळ अडीच दशकांपूर्वी अस्तित्वात आलेलं वायफाय तंत्रज्ञान, आज आंतरजालावर (इंटरनेट) प्रवेश मिळवण्यासाठी सर्वाधिक वापरलं जाणारं तंत्रज्ञान आहे यात शंका नाही. आजघडीला उत्पादित होणारं प्रत्येक इलेक्ट्रॉनिक उपकरण हे वायफाय सेवेला जोडलं जाण्यास पूर्णत: सक्षम असतं; मग ते लॅपटॉप, डेस्कटॉप किंवा टॅबलेट संगणक असोत, 'स्मार्ट' म्हणवली जाणारी उपकरणं (जसं मोबाइल फोन, टीव्ही, प्रिंटर आदी) असोत किंवा अगदी वस्तुजालाशी (इंटरनेट ऑफ थिंग्स) जोडली गेलेली विविध प्रकारची उपकरणं असोत. गेल्या केवळ एका वर्षांत ३०० कोटींहून अधिक वायफाय-सक्षम उपकरणांची निर्मिती केली गेली, यावरूनच डिजिटल युगातील वायफाय सेवेची निकड आणि लोकप्रियता ध्यानात येईल.

वायफायच्या लोकप्रियतेमागे असलेलं आणखी एक कारण म्हणजे- या सेवेची सार्वत्रिक उपलब्धता! आज आपण घरी, कार्यालयात वायफाय सेवेचा वापर करतोच, पण प्रामुख्यानं विकसित देशांत अशी एकही सार्वजनिक जागा नसेल जिथं ही सेवा मोफत उपलब्ध नाही. भारतातही अनेक शहरांमध्ये, रेल्वे स्थानकांवर वा गाडय़ांमध्ये, विमानतळांवर, उपाहारगृहांत आज या सेवेचा सर्रास वापर केला जातो. आंतरजालाशी सतत जोडलेले राहण्यासाठी, वैयक्तिक वा व्यावसायिक स्तरावर माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी सेल्युलर सेवेप्रमाणेच वायफाय सेवा ही वरदान आहे. दुर्दैवाने, माहिती युगात जेव्हा एखादं तंत्रज्ञान मोफत किंवा अत्यंत माफक दरात उपलब्ध होऊ लागतं, तेव्हा विदासुरक्षा आणि गोपनीयता संरक्षणाच्या दृष्टीनं नवनवी आव्हानं निर्माण होऊ लागतात.

आपण आपला लॅपटॉप अथवा मोबाइल फोन वायफायला जोडतो तेव्हा आपली कोणत्या प्रकारची खासगी माहिती आंतरजालावर प्रसृत केली जाते? अशा माहितीच्या सुरक्षेची कितपत हमी वायफाय सेवापुरवठादाराकडून दिली जाते? खासगी किंवा सार्वजनिक वायफाय सेवेचा लाभ घेताना एक वापरकर्ता म्हणून आपल्याकडूनही काही शिस्तपालन अपेक्षित आहे का? या प्रश्नांना भिडण्यापूर्वी वायफाय तंत्रज्ञानाची जडणघडण समजून घेणं आवश्यक आहे; कारण त्या पार्श्वभूमीवरच आपल्याला वरील प्रश्नांची उत्तरं शोधावी लागतील.

वायफाय हे रेडिओ लहरींचा वापर करून बिनतारी संदेशवहन करण्याचे तंत्रज्ञान आहे. इन्स्टिटय़ूट ऑफ इलेक्ट्रिकल अ‍ॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअर्स (आयईईई, ज्याचा उच्चार तीन 'ई'मुळे 'आय-ट्रिपल ई' असा करतात) या विद्युत आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील विविध तंत्रज्ञानांची मानके (स्टॅण्डर्ड्स) बनविणाऱ्या अमेरिकेतल्या अग्रगण्य संस्थेनं वायफाय तंत्रज्ञान वापरण्यासाठीचे नियम १९९७ मध्ये तयार केले, ज्यांना तांत्रिक भाषेत '८०२.११' असेही संबोधले जाते. या नियमांच्या अधीन राहून कोणतीही कंपनी अथवा संस्था वायफाय परिसंस्थेमध्ये (इकोसिस्टीम) वापरली जाणारी उपकरणे बनवू शकते.

सुरुवातीला या तंत्रज्ञानाला त्याच्या नामांकनाप्रमाणे '८०२.११' असेच संबोधले जाई. पुढील दोन वर्षांत जसजसं हे तंत्रज्ञान लोकप्रिय होऊ लागलं तेव्हा याचं आकर्षक व लोकांच्या सहज लक्षात राहील असं नामकरण करण्याची गरज अधोरेखित होऊ लागली. ऑगस्ट १९९९ मध्ये मग 'आय-ट्रिपल ई'ने आपल्या सल्लागारांच्या प्रस्तावांमधून 'वायफाय' या शब्दाची निवड केली आणि या तंत्रज्ञानाला एक स्वतंत्र नाममुद्रा मिळाली. असाही एक मतप्रवाह आहे की, वायफाय हे 'वायरलेस फिडेलिटी' या शब्दाचे संक्षिप्त रूप आहे. पण पुढे 'आय-ट्रिपल ई'नेच स्पष्ट केल्याप्रमाणे हा समज खरा नाहीये. आता वायफाय तंत्रज्ञान काम कसं करतं, हे थोडक्यात जाणून घेऊ या (आकृती पाहा). लॅपटॉप, मोबाइल फोन यांसारख्या उपकरणांद्वारे (ज्यांना 'स्टेशन्स' असं म्हणतात) वायफाय सेवेला जोडून घेण्यासाठी आपल्याला या उपकरणांत असलेला वायफाय अँटेना मदत करत असतो. या अँटेनाच्या मदतीने आपल्या उपकरणाला त्याच्या ५० ते १०० मीटपर्यंत असलेल्या 'वायफाय राउटर'शी संधान साधता येते. या राउटरला तांत्रिक भाषेत 'अ‍ॅक्सेस पॉइंट' तर बोली भाषेत 'हॉटस्पॉट' असंही म्हणतात. सार्वजनिक ठिकाणी तर एका अ‍ॅक्सेस पॉइंटशी शेकडय़ानं उपकरणं जोडलेली असतात. आपल्या उपकरणानं जरी अ‍ॅक्सेस पॉइंटशी यशस्वीरीत्या संधान साधलं, तरीही आंतरजालावर प्रवेश मिळवण्यासाठी तेवढं पुरेसं नसतं. अ‍ॅक्सेस पॉइंट हा (बऱ्याचदा इथरनेट तारांद्वारे) इंटरनेट सेवा त्याच्यापर्यंत पुरवणाऱ्या एका वितरण व्यवस्थेशी जोडलेला असतो, ज्याला तांत्रिक भाषेत 'गेटवे' असं म्हणतात. विमानतळांसारख्या ठिकाणी जिथं एका वेळेला हजारो लोक एअरपोर्ट वायफाय सेवेचा वापर करत असतात तेव्हा तिथं असलेले अनेक अ‍ॅक्सेस पॉइंट्स हे एका गेटवेशी जोडले



गेलेले असतात. हा गेटवे पुढे जाऊन आंतरजाल सेवापुरवठादारांच्या (आयएसपी) यंत्रणेशी जोडला जाऊन मग इंटरनेट सेवा सुरळीतपणे अ‍ॅक्सेस पॉइंटशी जोडलेल्या सर्व वापरकर्त्यांना मिळत राहते.

आपल्या फोनला जवळच्या मोबाइल मनोऱ्याशी जोडून आपल्याला विविध सेवा पुरवणाऱ्या सेल्युलर व्यवस्थेशी वायफाय सेवेचं साधर्म्य आहे असं वाटू शकेल; पण ते तितकंसं खरं नाही. सर्वात महत्त्वाचा फरक म्हणजे, वायफाय तंत्रज्ञान वापरण्यासाठी उपयोगात येणारा ध्वनिवर्णपट (स्पेक्ट्रम) हा नि:शुल्क आहे; सेल्युलर लहरींप्रमाणे वायफाय लहरींचा लिलाव होत नाही किंवा त्याचा वापर करायला शासकीय परवानाही लागत नाही. म्हणजेच वायफाय मानकांत नमूद केलेल्या नियमांना अनुसरून कोणतीही कंपनी वायफाय सेवा प्रदान करण्यास लागणाऱ्या (आकृतीत उल्लेखलेल्या) उपकरणांची निर्मिती करू शकते. अशा निकोप स्पर्धेमुळे या उपकरणांच्या क्षमतेमध्ये उत्तरोत्तर वृद्धी होत गेली, तसेच एकंदरच वायफाय सेवा अत्यंत माफक दरात ग्राहकांना उपलब्ध होऊ शकली. प्रत्येक यशोगाथेमागे किमान एक तरी नायक अथवा नायिका असतेच. वायफायच्या बाबतीत अशा नायकत्वाचा मान द्यायचाच झाला तर तो अमेरिकी दूरसंचार आयोगामध्ये (एफसीसी) संचालक पदावर काम करणाऱ्या मायकल मार्कसला द्यावा लागेल. वायफाय तंत्रज्ञान रेडिओ लहरींच्या ज्या वारंवारतेवर (फ्रिक्वेन्सी) काम करते, त्या खऱ्या तर एफसीसीनं औद्योगिक, वैज्ञानिक आणि वैद्यकीय कारणांमुळे होणाऱ्या उत्सर्जनासाठी राखीव ठेवल्या होत्या. उदाहरणार्थ, मायक्रोवेव्ह ओव्हनमधून होणारे उत्सर्जन या गटात मोडत असे. या लहरींना एकत्रितपणे त्यांच्या इंग्रजी आद्याक्षरानुसार 'आयएसएम लहरी' असं म्हणत. एफसीसीनं विविध कारणांसाठी विभागलेल्या लहरींचे निरीक्षण करत असताना मार्कसला एक गोष्ट ध्यानात आली की, शासकीय नियमांप्रमाणे औद्योगिक, वैज्ञानिक किंवा वैद्यकीय कारणांसाठी होणाऱ्या उत्सर्जनावर प्रचंड मर्यादा असल्याने आयएसएम ध्वनिवर्णपटाचा वापर जवळपास नगण्य होता. या वापराशिवाय पडून राहिलेल्या रेडिओ लहरी जर काही नियमांच्या अधीन राहून संदेशवहनासाठी विनापरवाना खुल्या केल्या तर त्याचा लाभ दूरसंचार क्षेत्रातील शास्त्रज्ञांना दळणवळणाच्या क्षेत्रात नवनवीन शोध लावण्यास करता येईल, असा द्रष्टा विचार त्यानं केला. लागलीच मार्कसनं आपली कल्पना एफसीसीच्या संचालक मंडळाच्या गळी उतरवली आणि एफसीसीनं आयएसएम लहरींच्या खुल्या वापरास परवानगी दिली. 'आय-ट्रिपल ई'नं जेव्हा जून १९९७ मध्ये वायफाय मानकाची (८०२.११) पहिली आवृत्ती प्रसिद्ध केली, तेव्हा इंटरनेटच्या सार्वत्रिक वापराला हातभार लागावा आणि या क्षेत्रात नावीन्यपूर्ण कल्पनांचा उगम होण्यास उत्तेजन मिळावं म्हणून विनापरवाना उपलब्ध असलेल्या आयएसएम लहरींचाच वापर वायफाय तंत्रज्ञानासाठी करण्यास संस्थेनं पसंती दिली होती. १९९७ मध्ये वायफाय सेवेचा कमाल वेग हा दोन एमबीपीएसपर्यंत (१ एमबीपीएस = १० लाख बिट्स प्रति सेकंद) मर्यादित होता. आजच्या गिगाबिट्स प्रति सेकंदच्या जमान्यात हा वेग बैलगाडीचा वाटेल; पण एक लक्षात घ्यायला हवं की, १९९७ मध्ये इंटरनेटचा व्यावसायिक वापर सुरू होऊन केवळ दोनच वर्षं झाली होती आणि त्या वेळी इंटरनेटसाठी उपलब्ध असलेल्या डायल-अप तंत्रज्ञानापेक्षा (ज्यात लॅण्डलाइन फोनच्या तांब्यांच्या तारांचा माहितीच्या वहनासाठी उपयोग केला जाई) वायफाय तंत्रज्ञान किमान २० पटींनी वेगवान होतं.

# कंपनीतही घडू लागले मारहाणीचे प्रकार, कामात चुका काढल्याने तिघांना मारहाण

पिंपरी: रस्त्यावर किरकोळ वादातून भांडणे होत असतात. त्यातून अनेकदा मारहाणीचे प्रकारही घडतात. पण आता कंपनीत किरकोळ वादातूनही थेट मारहाण होण्याच्या घटना समोर येऊ लागली आहेत. पिंपरीत एका कंपनीत कामात चुका काढल्याने कंपनीतील तिघांना मारहाण केली. याप्रकरणी पाच जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ग्रोफर्स कंपनी, मॅगझीन चौक, दिघी येथे बुधवारी सायंकाळी सात ते रात्री आठच्या दरम्यान ही घटना घडली.कार्तिक संजय वानखेडे (वय १९, रा. भोसरी) यांनी याप्रकरणी दिघी पोलीस ठाण्यात शुक्रवारी फिर्याद दिली आहे. शुभम दिलीप पवार (वय १८), निरंजन दिलीप पवार (वय २०), दिलीप पवार (वय



५०), संतोष पवार (वय ३०), विजय पवार (वय २८, रा. दिघी), अशी आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ग्रोफर्स कंपनीमधील कामगार मिलिंद गोविंद नवसागर याने शुभम पवार याच्या कंपनीमधील कामांमध्ये चुका काढल्या. याचा राग मनात धरून शुभम व निरंजन यांनी मिलिंद यांना शिवीगाळ केली. शिवीगाळ करू नका, असे वानखेडे व कामगार दीपक यांनी सांगितले. त्यानंतर आरोपी कंपनीच्या बाहेर गेले. त्यानंतर अन्य लोकांना कंपनीमध्ये घेऊन आले. आरोपींनी कंपनीत बेकायदेशीर जमाव जमवला. तसेच कंपनीतील कामगार मिलिंद नवसागर व दीपक कांबळे आणि वानखेडे यांना हाताने मारहाण केली.

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

Head Office -- Late Indira Gandhi Bhavan, Chhatrapati Shivaji Maharaj Marg, Bhaindar (W) Tal. Dist – Thane - 401101,
Telephon : 28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 25145895 Fax : 28197636

// Public Works Department //

No. MBMC/PWD/Tender/ 15 /2021-22 Date :- 28 / 04 / 2021

// SECOND EXTENSION //

Notice No. 07


Mira Bhayander Municipal Corporation invites Sealed tenders of Works in MBMC Area. In the same tender Notice, the Tender ID No. 675452_1 has been extended 28/04/2021 to 03/05/2021 up to 12.00 pm. This Notice will be available on MBMC's e-Tendering website as https:// mahatenders.gov.in.

जा क्र./ मनपा/जनसंपर्क/55/2021-22
दि. 22/04/2021

Sign/-
Executive Engineer (PWD)
Mira Bhaindar Municipal corporation

# अकोट: जेवण बनविण्याचे कारणावरुन एकाची हत्या

अकोटः सातपुडा पायथ्याशी असलेल्या पिंप्री खुर्द शिवारात जेवन बनविण्याचे कारणावरुन मध्यरात्री हत्याकांड घडल्याची घटना २ मे रोजी उघडकीस आली. या हत्याकांडानंतर पळालेल्या आरोपीला पकडण्यात ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार ज्ञानोबा फड यांचा जनसंपर्क कामी आला. काही तासातच अकोट ग्रामीण पोलीसांनी मोठ्या शिताफीने पकडून बेड्या ठोकल्या आहेत.अकोट तालुक्यातील पिंप्री खुर्द येथील गजानन बोदडे यांचे शेतात संत्रा झाडाची खोड काढण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील गिरगोटी गावातील छबुलाल भुसुम, प्रभु राजराम धीकार व रतीराम राजाराम दारशिंबे हे तीन आदिवासी मजुर आले होते. या मजुरांनी दिवसभर काम करुन रात्री दारु ढोसली. त्यानंतर रात्री १२ वाजता नंतर स्वयंपाक कोणी करण्याचा या कारणावरुन शेतातच वादावादी सुरु झाली. यावेळी प्रभु राजाराम धीकार यांने रतीरामला मारहाण केल्याने तो पळुन गेला. त्यानंतर छबुलाल भुसुम यांला प्रभु राजाराम धीकार यांने कुऱ्हाडाने व लाकडांनी चांगली मारहाण केली. त्यामुळे जखमी अवस्थेत असेल्या छाबुलाल भुसुम याचा मारहाणीत मृत्यू झाल्याने प्रभू धिकार पळुन गेला. त्यानंतळ सकाळी रतीराम हा शेतातील घटनास्थळी आल्यानंतर त्याला छबुलाल शुकलाल भुसुम ची हत्या झाली असुन मृतदेह आढळला. हत्याकांडाची माहीती मजुर




कंत्राटदार शरिफोद्दीन नशीरोद्दीन रा. अकोट याला दिल्यानंतर पोलीस पाटील, रतीराम, शेतमालक व मजुर कंत्राटदार यांनी अकोट ग्रामीण पोलीस स्टेशन गाठले. सविस्तर घटनेची माहीती घेताच पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेतील आरोपी प्रभु धीकार हा पळुन गेला होता. या प्रकरणी पोलीसांनी आरोपी प्रभु धीकार यांचे विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला सोमठाणा येथुन अटक केली असुन पुढील तपास सुरु आहे.अशा ठोकल्या आरोपीला बेड्यामध्यरात्री हत्याकांडानंतर आरोपी हा घटनास्थळावरून जंगलाकडे पसार झाला असे लोकेशन पोलीसांना मिळाले.

त्यामुळे आरोपीला पकडणे

# म्हाडाच्या घरांचे आमिष; २९ लाखांची फसवणूक




नाशिक : म्हाडाच्या घरांची जाहिरात दाखवून या प्रकल्पात घर मिळवून देतो, असे आमिष दाखवून सहा जणांची जवळपास २९ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी संशयित किशोर सरोदे (रा. पाथर्डी फाटा) याच्याविरोधाच इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नितीन प्रभाकर भोळे (४६, रा. वडाळा गाव) यांनी इंदिरानगर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून किशोर सरोदे याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ फेब्रुवारी २०१९ ते १ मे २०२१ दरम्यान संशयित किशोर सरोदे याने म्हाडाचे घर मिळवून देतो, असे आमिष दाखवून फिर्यादीसह पाच जणांकडून २८ लाख ८५ हजार रुपयांची रक्कम घेतली. यात फिर्यादी नितीन भाळे यांच्याकडून ४ लाख ५० हजार, कल्पना भोळे यांच्याकडून ४ लाख ५० हजार, भावना कोल्हे यांच्याकडून ४ लाख ५० हजार, वंदना चौधरी यांच्याकडून ६ लाख, पुष्पा पवार यांच्याकडून ४ लाख २० हजार, तर गायत्री महाले यांच्याकडून ५ लाख १५ हजार रुपयांची रक्कम घेतली. मात्र, त्यांना घर मिळवून दिले नाही. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात येताच नितीन भोळे यांनी इंदिरानगर पोलीस ठाण्यात धाव घेत संशयित किशोर सरोदे याच्या विरोधात फिर्याद दिली.

याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक उघडे तपास करीत आहेत.

# परमबीर सिंग यांच्याविरुद्धच्या चौकशीतून संजय पांडेंची माघार





मुंबई : तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करीत महाविकास आघाडीला अडचणीत आणलेल्या मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्याविरोधातील प्राथमिक चौकशी करण्यास पोलीस महासंचालक संजय पांडे यांनी नकार दिला आहे. त्याबाबत त्यांनी सरकारला पत्र लिहून असमर्थता कळविली आहे. त्यामुळे सरकारला आता त्यांच्याऐवजी दुसरा चौकशी अधिकारी नेमावा लागणार आहे.परमबीर सिंग यांनी आपल्या विरुद्धची चौकशी थांबविण्यासाठी गुरुवारी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यामध्ये पांडे यांनी आपण २० मार्चला मुख्यमंत्र्यांना लिहिलेले पत्र मागे घेण्याचा सल्ला दिला होता, असा आरोप केला आहे. त्याबाबतची सुनावणी मंगळवारी होणार असताना पांडे यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. परमबीर सिंग यांच्या 'लेटर बॉम्ब'मुळे राज्याचे राजकारण व पोलीस वर्तुळात खळबळ उडाली हा◌ेती. त्यामुळे देशमुख यांना राजीनामा द्यावा लागला, तर सीबीआयने त्यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांच्या घरी छापे टाकले.

# बेपर्वाईबद्दल जाब विचारल्यानं डॉक्टरांकडून रुग्णाच्या नातेवाईकांना मारहाण; 3 रुग्णांचा जागीच मृत्यू



निष्काळजी पणाच्या आरोपाखाली डॉक्टर आणि रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये हाणामारी झाली. या दरम्यान रुग्णालयात दाखल झालेल्या तीन रुग्णांचा मृत्यूदेखिल झाला. शनिवारी ग्वाल्हेरमधील कमलाराजा रुग्णालयात ही खळबळजनक घटना घडली. तेथे दाखल असलेल्या रूग्णांचे कुटुंबिय आणि डॉक्टर यांच्यात भांडण झाले. त्यावेळी डॉक्टरांनी धावत जाऊन महिलांना मारहाण केली. CoronaVaccine : तरूणांसाठी लस घेणं कितपत सुरक्षित?; लसीकरणानंतर या गोष्टींची काळजी घ्या, तरच होईल बचावया सगळ्यात रुग्णालयात दाखल झालेल्या ८० वर्षीय शकुंतला देवी यांचे निधन झाले. या घटनेनंतर त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी रुग्णालयात कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांशी वाद घातला. यानंतर संतप्त कर्मचारी परिचारिकांनी प्रभाग सोडला. परिणामी योग्यवेळी सुविधा न मिळाल्यानं आणखी दोन रुग्णही मरण पावले. तथापि, डॉक्टरांचे म्हणणे आहे की रुग्णाची प्रकृती आधीच गंभीर होती.CoronaVaccine : संक्रमण होतंच मग कोरोनाची लस का घ्यायची? तज्ज्ञांनी सांगितला लस घेण्याचा सगळ्यात मोठा फायदामहिलेचा ऑक्सिजन मास्क डॉक्टरांनी काढून घेतल्याचा आरोप महिलेच्या कुटुंबियांनी केला. यामुळे त्याचा मृत्यू झाला. तर डॉक्टर फराज आदिल आणि इतरांनी हे आरोप फेटाळले. यानंतर, पहिल्यांदा कुटुंबाने वॉर्डमध्येमध्ये गोंधळ घातला त्यानंतर डॉक्टर निघून गेले. थोड्या वेळाने डझनाहून अधिक डॉक्टर वॉर्डात आले.या डॉक्टरांनी रुग्णाच्या कुटुंबातील सदस्यांना मारहाण केली. डॉक्टरांनी त्या रुग्ण महिलेलादेखील वाचवले नाही.

# फडणवीस यांची बदनामी करणाऱ्यांवर गुन्हा दाखल




नाशिक : नाशिक शहरातील कोरोनास्थितीचा आढावा घेण्यासाठी आलेले विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचा बिटको रुग्णालयात व्हिडिओ काढून सोशल मीडियावर बदनामी केल्याप्रकरणी नाशिक पोलिसांनी पाचजणांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. रूग्णालयांना ऑक्सिजन तसेच रेमडेसिविरचा पुरवठा होत नाही. या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. ३०) नाशिकरोड येथील महापालिकेच्या नवीन बिटको रुग्णालयाला भेट देऊन रुग्णांच्या नातेवाइकांची विचारपूस केली. बिटको रुग्णालयात ते पाहणी करत असताना, काहींनी त्यांचा व्हिडिओ काढून सोशल मीडियावर शिवराळ टिप्पणीसह तो व्हायरल केला.

त्यामुळे भाजपचे नाशिकरोड येथील ब्लॉक अध्यक्ष हेमंत गायकवाड यांनी पोलिसांत तक्रार केली आहे. त्यावरून देवेंद्र फडणवीस यांची बदनामी केल्याप्रकरणी रतन खालकर, संकेत भोसले, प्रमोद कोहकंडे, राहुल जोशी आणि बंटी ठाकरे या पाचजणांविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

# पाच करोना रुग्ण भीतीने पळाले, जिंतूर रुग्णालयातील प्रकार



परभणी जिल्ह्यातील जिंतूर शहरातील ग्रामीण रुग्णालयात करोना चाचणीमध्ये पॉझिटिव्ह आल्यावर आरोग्य कर्मचाऱ्यांना गुंगारा देऊन ग्रामीण भागातील पाच रुग्ण पळाल्याची घटना शनिवारी दुपारच्या सुमारास घडली.

जिंतूर शहरातील ग्रामीण रुग्णालयात करोना चाचणीमध्ये पॉझिटिव्ह आल्यावर आरोग्य कर्मचाऱ्यांना गुंगारा देऊन ग्रामीण भागातील पाच रुग्ण पळाल्याची घटना शनिवारी दुपारच्या सुमारास घडली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की , शनिवारी सावळी येथील तीन व कवडा (ता. जिंतूर) येथील दोन अशा एकूण पाच नागरिकांचा करोना चाचणी अहवाल पॉझिटिव्ह आला. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असताना या पाच रुग्णांनी कर्मचाऱ्यांना गुंगारा देऊ पळ काढला. याबाबत आरोग्य विभागाने पोलिसात तक्रार दिली आहे.

# कुंपणच शेत खातं! विशेष पथकातील पोलिसांनीच मागितला हप्ता




नगर : अवैध धंद्यांवर कारवाईसाठी पोलीस उपअधीक्षकांनी स्थापन केलेल्या विशेष पथकातील पोलिसांनीच वाळू व्यावयायिकाकडे पंधरा हजार रुपयांचा हप्ता मागितल्याचे उघड झाले आहे. लाच लुचपत प्रतिबंधक पथकाने या प्रकरणी तीन पोलिसांविरोधात गुन्हा दाखल केला. आरोपी फरारी आहे. शेवगावचे पोलीस उपअधीक्षक सुदर्शन मुंढे यांच्या पथकातील हे कर्मचारी असून, यातील एक जण मुंढे यांचा वायरसेल ऑपरेटर तर दोघे विशेष पथकातील आहेत.

नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ही कारवाई केली. तिघांनीही पाथर्डीच्या एका वाळू व्यावसायिकाकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला. वसंत कान्हु फुलमाळी (वायरसेस ऑपरेटर, रा. पाथर्डी), संदीप वसंत चव्हाण व कैलास नारायण पवार (दोघे विशेष पथकातील कर्मचारी, रा. पाथर्डी) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपअधीक्षक मुंढे यांच्या पथकात हे कर्मचारी कार्यरत होते. एप्रिल महिन्यात या पथकाने वाळू वाहतूक करणारे एक वाहन पकडले होते.

नगर जिल्ह्यातील वाळूचे लिलाव झालेले नाहीत. त्यामुळे अनेक कंत्राटदार बीड जिल्ह्यातून वाळू आणत आहेत. असेच एक वाळूची वाहतूक करणारे वाहन या तिघांनी पकडले होते. ते वाहन कारवाई न करता सोडून देण्यासाठी आणि पुढे हा व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी १५ हजार रुपये लाचेची मागणी या पोलिसांनी कंत्राटदाराकडे केली. मात्र, पाथर्डी येथील कंत्राटदाराने यासंबंधी लाचलुचपत प्रतिबंधक पथकाकडे तक्रार केली. सोबत रेकॉर्डिंगचे पुरावेही दिले. त्यांनतर एसीबीच्या पथकाने सापळ्याची तयारी सुरू केली. लाच मागितली जात असल्याची पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. त्यातून तक्रारीत तथ्य आढळून आले. मधल्या काळात याची चर्चा झाली. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यातील काही पोलिसांच्या बदल्याही केल्या. त्यातून सावध झाल्याने लाचेचा प्रत्यक्ष सापळा रचता आला नाही, मात्र लाच मागितल्याचा पुरावा एसीबीच्या अधिकाऱ्यांना मिळाला आहे. त्यानुसार या तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्याचे कळताच तिघेही फरारी झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक पथकाचे पोलीस निरीक्षक श्याम पवरे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# ऑक्सिजन अभावी रुग्णाचा मृत्यू



ऑक्सिजन व रुग्णवाहिका न मिळाल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णाचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी चिंचोली लिंबाजी (ता. कन्नड) येथे घडली. या रुग्णाला करोना झाल्याचा संशय होता. वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे रुग्णाचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाइकांनी केला आहे.

घाटशेंद्रा येथील दादाराव नारायण गवारे ( वय ४८) असे मृत रुग्णाचे नाव आहे. मृताच्या नातेवाइकांनी येथील आरोग्य विभागाच्या अनागोंदी कारभाराविषयी रोष व्यक्त करून मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला होता. मृतदेह तब्बल चार तास तसाच रुग्णालयातील टेबलवर पडून होता. यामुळे काही काळ येथे मोठा तणाव निर्माण झाला होता. प्रभारी तालुका आरोग्य डॉ.हेमंत गावंडे स्थानिक पदाधिकारी यांनी शनिवारी येथे भेट देऊन नातेवाईकांची समजूत काढून दोषींवर कारवाई करण्याचे व येथील रिक्त पदे भरण्याचे आश्वासन दिल्यानंतर नातेवाइकांनी मृतदेह ताब्यात घेतला. या घटनेमुळे येथील आरोग्य विभागाच्या कारभारा विषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.आता तरी आरोग्य विभाग रिक्त पदे व आरोग्य सुविधा याबाबत गांभीर्याने लक्ष देऊन परिसरातील आरोग्य सुविधा सुरळीत कराव्यात अन्यथा या आरोग्य केंद्राला कुलुप ठोकण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# बसमधील 'जीपीएस'मुळे चोर गजांआड



ठाणे, खासगी बस चोरणाऱ्या आरोपींचा बसमधील जीपीएस यंत्रणेमुळे छडा लावण्यात कोनगाव पोलिसांना यश आले आहे. चार आरोपींना अटक करत पोलिसांनी चोरलेली बसही जप्त केली आहे. या प्रकरणी कोनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ठाण्यातील वाहतूक व्यावसायिक राजेश पुजारी यांची शनिवारी रात्री १८ लाखांची खासगी प्रवासी बस चोरीला गेली होती. त्यांनी तात्काळ पोलिसांकडे धाव घेत तक्रार केली. बसमध्ये जीपीएस यंत्रणा असल्याने ही बस मानकोली परिसरात असल्याचे समजले. कोनगाव पोलिसांनी नारपोली पोलिस ठाण्यातील पोलिसांच्या मदतीने बसचा शोध सुरू केला. यामध्ये पोलिसांना यशही मिळाले. रमीज गुलाम सैय्यद, आलीम नागेमिया अन्सारी, मोजीम हुसेनमिया अन्सारी, रुस्तम नूरमोहम्मद अन्सारी यांना अटक करण्यात आली. तसेच, त्यांच्याकडून बसही जप्त केली. चौघेही आरोपी भिवंडी परिसरातच राहतात. या गुन्ह्याची उकल करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी अपर पोलिस आयुक्त अनिल कुंभारे, पोलिस उपायुक्त योगेश चव्हाण, सहाय्यक पोलिस आयुक्त प्रशांत ढोले, वरिष्ठ पोलिस निरीक्षक गणपतराव पिंगळे, पोलिस निरीक्षक राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कोनगाव आणि नारपोली पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केली.

# ठिणगीच्या उंबरठ्यावर



करोना साथीमुळे कधी नव्हे, इतका रुग्णालयांवरील भार वाढला असून रुग्णालयांची यंत्रणा २४ तास सक्रिय आहे. त्यामुळे रुग्णालयातील संसाधनांचा क्षमतेपेक्षा अधिक वापर होत आहे. जीवनावश्यक ठरणारी वैद्यकीय यंत्रणा अव्याहत सुरू ठेवावी लागत असल्याने या यत्रांनाही विश्रांती मिळत नाही. त्यामुळे यातून निर्माण होणारी एखादी ठिणगीही संपूर्ण रुग्णालय भस्मसात करते. परंतु या यंत्रणांबरोबरच रुग्णालयांमध्ये उभारण्यात येणाऱ्या अनावश्यक सुशोभीकरण, ज्वलनशील सजावट साहित्याचा अतिरेकी वापर, यामुळे रुग्णालये लाक्षागृह बनू लागली आहेत. मुंब्रा, विरार, मुंबई आणि जिल्ह्यातील बऱ्याच रुग्णालयांमध्ये अग्निसुरक्षेकडे केलेली डोळेझाक अशा परिस्थितीमध्ये रुग्णांसाठी जीवघेणी ठरत आहे. ठाण्यातील आरोग्यसेवा देणाऱ्या रुग्णालयांच्या अग्निसुरक्षेच्या व्यवस्थेचा हा आढावा...

९ डिसेंबर २०११ रोजी कोलकाता येथील एएमआरआय रुग्णालयास लागलेल्या आगीमध्ये ८९ जणांना जीव गमवावा लागला होता. या दुर्घटनेनंतर जाग आलेल्या केंद्र आणि राज्य सरकारने सर्व रुग्णालये आणि नर्सिंग होममध्ये अग्निसुरक्षा चोख ठेवण्यासाठी नियमावली तयार केली. फेब्रुवारी २०१२मध्ये १३ कलमी नियमावली जारी करून रुग्णालयांना त्याचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले. रुग्णालयामधील प्रवेश आणि बाहेर पडण्यासाठी दोन स्वतंत्र मार्गिका, रुग्णालयात फायर एक्स्टिंग्विशर, स्प्रिंकलर, स्मोक डिटेक्टर, हाऊसरोल, ड्राय रायझर, वेट रायझर बसवावेत. रुग्णालयास आग लागल्यास ती आटोक्यात आणण्यासाठी रुग्णालयाने भूमिगत आणि गच्चीवर पाण्याची टाकी बांधावी. शॉर्टसर्किटमुळे लागलेली आग आटोक्यात आणण्यासाठी वाळूच्या बादल्या भरून ठेवाव्यात. सुमारे आठ ते नऊ वर्षांपूर्वी लागू करण्यात आलेल्या या अटींचे अनेक रुग्णालयांकडून अद्याप पालन केले जात नाही.

# 'भारतनाना माफ करा, सैनिकांच्या पत्नीचा अपमान करणारी प्रवृत्ती जिंकली'



मुंबईः पंढरपूर- मंगळवेढा विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपच्या समाधान अवताडेंचा विजय झाला आहे. भाजपचा विजयाचा मोठा धक्का महाविकास आघाडीला बसला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अमोल मिटकरी यांनी प्रतिक्रिया दिली आहे राष्ट्रवादीचे आमदार भारत भालके यांच्या निधनाने रिक्त झालेल्या या जागेवर पोटनिवडणूक जाहीर झाली होत. ही जागा २००९पासून सलग तीनवेळा भारत भालके यांनी जिंकली होती. पोटनिवडणुकीत त्यांचे चिरंजीव भगिरथ यांना पक्षाने उमेदवारी दिली मात्र त्यांचा येथे पराभव झाला. दरम्यान विजयी झालेले भाजपाचे समाधान आवताडे हे २०१४ पासून या मतदारसंघात नशीब आजमावत आहेत. त्यांना तिसऱ्या निवडणुकीत विजय मिळविता आला आहे. भाजपच्या या विजयावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी भाष्य केलं आहे.

'भारतनाना माफ करा. तुम्ही केलेली सेवा भक्त पुंडलिकरुपी असली तरी तुमच्या सेवेपेक्षा मसल आणि मनीपॉवर वापरुन भाजपाने लढवलेली ही निवडणुक धनशक्ती विरुद्ध जनशक्ती होती. पैसा व सैनिकांच्या पत्नीचा अपमान करणारी प्रवृत्ती जिंकली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्क:-9594418181 / 8424989898